पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८, स्थापत्य मुख्यालय
क्र.स्था/लेखा/३/कावि/ ९४५/२०१७
दिं. ०७ /०६/२०१७

विषय – विकास कामांची बिले अदायगीबाबत...
संदर्भ – क्र.स्था/लेखा/३/कावि/१२२/१६ दि.०७/१२/२०१६

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत प्रतिवर्षी विविध विकास कामांच्या निविदा प्रसिध्द करून अशी कामे ठेकेदारामार्फत करून घेतली जातात. ठेकेदारांनी केलेल्या कामांचे बील तयार करणेपुर्वी उपअभियंता / कनिष्ठ अभियंता यांनी खालीलबाबींची पुर्तता करून बीले अदा करणेसाठी स्थापत्य लेखा विभागात पाठवणे आवश्यक आहे. याबाबत आवश्यक त्या सुचना यापुर्वीच संदर्भिय परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. परंतु त्याची काटेकोरपणे अमंलबजावणी न करता बीले पाठवण्यात येत आहेत. व त्यामुळे तेच आक्षेप पुन्हा उपस्थित होऊन बील लेखा विभागाकडून परत येत आहेत. सदरची बाब अत्यंत गंभीर आहे. म्हणून पुनश्च: एकदा खालील सुचना देण्यात येत आहेत.

१) प्रत्येक बीलासोबत ठेकेदारांनी त्या कामावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची यादी व त्यांचे पी.एफ. भरणा केल्याची चलने नस्तीत समाविष्ठ केल्या नंतरच उपअभियंता यांनी बील अदायगीची शिफारस करावी. पीएफचा भरणा केला नसल्यास अशी बीले अदायगीसाठी पाठवू नयेत.
२) कामाचा व कामगारांचा विमा (पाँलिसी प्रत) बील नस्तीत समाविष्ठ करणे आवश्यक आहे. कामाचा विमा आदेशाच्या दिनांकापासून काढणे आवश्यक आहे.
३) बीले (Arathmatical) तपासणीस देणेपुर्वी स्थळ प्रतीवर कनिष्ठ व उपअभियंता यांनी स्वाक्ष-या करणे आवश्यक आहे.
४) प्रत्येक बीला सोबत एस.जी.एस. / आय.आर.एस. यांचे (Activiti Report) रिपोर्ट जोडणे आवश्यक आहे.
५) आर.ए. बीलासोबत IR असल्यास तो तांत्रीक कक्षाकडून तपासणी करून घेणे आश्यक आहे.
६) बील नस्तीमध्ये मा.स्थायी समिती मंजूर ठरावाची प्रत दाखल करावी.
७) मोजमाप पुस्तकात कामाचे मोजमाप नमुद करताना ठेकेदाराने प्रत्येक्ष काम केलेला दिनांक नमुद करणे अत्यावश्यक आहे. (Date of Recording)
८) ठेकेदारांनी प्रत्येक्ष काम करताना साईट वर खरेदी केलेल्या मालाची बीले उपप्रमाणके / चलने नस्तीत समाविष्ठ करणे आवश्यक आहे.
९) मोजमाप पुस्तकातील नोंदी सुवाच्छ व नीटनेटक्या घेवून खडाखोड / ओव्हर राईटींग करू नये. अन्यथा अशा नोंदीच्या ठिकाणी कनिष्ठ अभियंता यांनी स्वाक्षरी करावी.
१०) मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र.आक/कावि/१७४/२०१६ दि.११/११/२०१६ नुसार कामाचे मुदतवाढी बाबत पुर्तता करून बील तपासणीसाठी शिफारस करावी.
११) अंदाजपत्रकात कामासाठी केलेल्या तरतुदीच्या मर्यादितच बील अदायगीची शिफारस करावी.